# आधुनिक काव्यप्रयोजन-अभिनवकाव्यालंकारसूत्रम् ग्रन्थाच्या सन्दर्भात

नंदा ज. पुरी
अधिष्ठाता, संस्कृत आणि संस्कृतेतर भाषा संकाय, क.कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक

काव्यशास्त्रात काव्यप्रयोजनाचे महत्त्व अनितरसाधारण आहे. सामान्य मनुष्य जीवनातही प्रयोजनाशिवाय कोणतेही कार्य करीत नाही. प्रयोजनं विना न मन्दोऽपि प्रवर्तते ही उक्ती प्रसिद्धच आहे. भरतमुनींचा नाट्यशास्त्र हा ग्रन्थ नाट्यशास्त्रातील पर्यायाने काव्यशास्त्रातीलही आद्य ग्रन्थ आहे. त्यामुळ काव्यप्रयोजनांचा विचार करताना भरतमुनीं पासूनच करायला हवा. काव्यशास्त्राच्या आलोडनाने एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे कव्यशास्त्रातील कोणत्याही तत्त्वाचा विचार भरतमुनीं पासून केला जातो. भरतमुनीं पासून सुरु झालेली ही परंपरा साधारणपणे जगन्नाथपण्डिता पर्यन्त म्हणजेच सतराव्या शतकापर्यन्त सांगितली जाते. परन्तु काव्यशास्त्राच्या इतिहासात पुढे एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकातही काव्यशास्त्रीय परम्परा अक्षुण्ण रहिलेली दिसते.प्राचीन काव्यग्रन्थाप्रमाणेच सूत्ररूपात किंवा कारिकारूपात अशा ग्रंथाची रचना झालेली आहे. याचे उत्तम उदाहरण म्ह्णजे प्रा. राधावल्लभ त्रिपाठी यांचा अभिनवकाव्यालंकारसूत्रम् नावाचा काव्यशास्त्रातील ग्रन्थ. आन्तरराष्ट्रिय ख्यातिप्राप्त व्यक्तिमत्वाचे धनी असलेले प्रा. राधावल्लभ त्रिपाठी जेव्हा काव्यशस्त्रावर ग्रन्थरचना करतात तेव्हा संपूर्ण काव्यशास्त्राच्या ग्रन्थातून आलेला ते शास्त्रनवनति असते. त्याचा अभिनवकाव्यालंकारसूत्रम् हा सूत्ररूपग्रन्थ असून तो स्वोपज्ञकारिकावृत्तिसंवलित आहे. या सम्पूर्ण ग्रन्थाचे समीक्षण एका शोधपत्रात शक्य नसल्याने या ग्रन्थातील केवल कव्यप्रयोजनांचा विचार येथे केलेला आहे.

प्रा. त्रिपाठींच्या काव्यप्रयोजनांचा विचार करण्यापूर्वी पूर्वतन आचार्याच्या काव्यप्रयोजनाचा आढावा घेणे गरजेचे आहे. अर्थातच ही काव्यपरम्परा भरतमुनीं पासूनच बघायला हवी. भरतमुनींनी नाट्यशास्त्रात नाट्याची प्रयोजने सांगताना म्हणतात –

> उत्तमाधममध्यमानां नराणां कर्मसंश्रयम्।
> हितोपदेशजननं धृतिक्रीडासुखदिकृत्॥
> दु:खार्तानां श्रमार्तानां शोकार्तानां तपस्विनाम्।
> विश्रान्तिजननं काले नाट्यमेतद् भविष्यति॥
> धर्म्यं यशस्यायुष्यं हितं बुद्धिविवर्धनम्।
> लोकोपदेशजननं नाट्यमेतद्भविष्यति॥ नाट्यशास्त्रम्, १.११४,११६,११७

याच नाट्य प्रयोजनांचा विचार करीत परवर्ती आचार्यांनी प्रयोजनांमध्ये वेगवेगळ्या तत्त्वाची भर घातली असली तरी मुलत: सर्व प्रकारच्या रसिकांच्या आनंदाचा विचान्र प्राध्यान्याने केला असे दिसते. नाट्य हितोपदेश देणारे असले तरी रसिकाचे मनोरञ्जन आणि त्यांना मिळणारा आंनद भरतमुनींनी धृतिक्रीडासुखादिकृत् या पदातून व्यक्त केला आहे. नाट्याची निर्मितीच मुळात इंद्रादि देवतांच्या प्रार्थने वरून त्यांना “क्रीडनक” म्ह्णजे मनोरञ्जनाचे साधन हवे म्हणून झालेली आहे.

भामहाने काव्यप्रयोजनांचा विचार करताना धर्मार्थकाममक्षां मधील प्राविण्या सोबत कलांमधील, वैचक्षण्य आणि प्रीतीचाही विचार केला. भामह म्हणतो –

> धमार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च ॥
> करोति कीर्तिं प्रीतिं च साधुकाव्यनिबन्धनम्॥ काव्यालङ्कार:,१.२

याच आधारावर भामहाने उत्तम काव्यामुळे मिळणारया यशामुळेच कवी स्वर्गात देवपदाचा उपभोग घेऊ शकतो असे म्हटले आहे. हीच प्रयोजने भामहानंतरच्या काव्यशास्त्रविदांनी सागितली. वामनाने यापैकी केवळ दोनच प्रयोजने सांगितली ती म्हणजे प्रीती आणि कीर्ती.

> काव्यं तद् दृष्टादृष्टार्थं प्रीतिकीर्तिहेतुत्त्वात्। काव्यालङ्कारसूत्रवृत्तिः १.१.५

याठिकाणी आनन्द हे दृष्ट प्रयोजन आणि कीर्ती हे दृष्ट प्रयोजन आहे. उत्तम कीर्तीला तो स्वर्गफला म्हणतो तर अकीर्तीला 'निरालोकनरकोद्देशदूतिका' म्हणतो. भामहानेही कुववित्वाला 'सा मृतिमाहुर्मनीषिण:' असे स्पष्ट प्रतिपादन केलेले आहे.

आनन्दवर्धनाने ध्वन्यालोकाच्या पहिल्याच कारिकेत 'तेन ब्रूम: सहृदय: प्रीतये तत्स्वरूपम्'( ध्वन्यालोक१.१)

असे म्हणून सहृदयाच्या मनाला होणारा आनन्द हेच प्रमुख प्रयोजन सांगितले आहे. हे प्रयोजन काव्याचे आहे काव्यशास्त्राचे नाही असे कोणी म्हणेल तर त्यावर विश्वनाथाचे उत्तर असे की, काव्यशास्त्र हे काव्याचेच

अंग असल्याने काव्यशास्त्राचीही आहेत. प्रयोजनानुसारच फळे ठरतात. त्यामुळे आनन्दवर्धनाने ग्रंन्थाचे सांगितलेले प्रयोजन काव्यालाही लागू पडते.

अभिनवगुप्तानेही आनन्दानुभूतीलाच प्राधान्य दिले आहे. ध्वन्यालोकावरील लोचनटीकेत तो म्हणतो – ‘श्रोतृणां च व्युत्पतिप्रीती अद्यापि स्त: तथापि तत्र प्रीतीरेव प्रधानम्। चतुर्वर्ग्युत्पतेरपि चानन्द एव पायर्न्तिकं मुख्यं फलम्।‘ (लोचन १.१ वरिल टीका) रसानभूतीच्या सन्दर्भात, ’ब्रह्मस्वादमिव अनुभावयन’ अशी आत्यन्तिक आनन्दनुभूतीची स्थिती तो वर्णन करतो. आनन्दवर्धनाच्या सहृदयानामानन्दो मनसि लभतां प्रतिष्ठितामिति प्रकाश्यते’ या व्याक्यातील सहृदयानामानन्दो या पदाच्या विवरणात सहृदयाचे लक्षण सांगतो. ’येषां काव्यानुशीलनाभ्यासवशाद्वशीभूते मनोमुकुरे वर्णनीयतन्मयीभवनयोग्यता ते सहृदयसंवादभाजास सहृदया।’ काव्यानुशीलनाच्या अभ्यासाने ज्याचे अन्त:करण स्वच्छ झालेले आहे अशा आरशाप्रमाणे स्वच्छ अन्त:करणात वर्ण्य विषयाशी तन्मय होण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठिकाणी आहे, जे स्वहृदयाचा संवाद कविहृदयाशी अनुभवतात ते सहृदय होत. सहृदय म्हणजे समान हृदय असलेले हाच अर्थ घेऊन त्रिपाठीनी ’समान हृदयानि व: ” (ऋ.१७.१९१) चा सन्दर्भ दिलेला आहे.

कुन्तकाने काव्यरचना म्हणजे अभिजाताच्या धर्मार्थकाममोक्षाच्या सिद्धीचा सरल मार्ग आहे. आणि सत्काव्य ज्ञानाने व्यवहारज्ञान प्राप्त होते असे म्हटले आहे. आणि सत्काव्य ज्ञानाने व्यहार ज्ञान प्राप्त होते असे म्हटले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चतुर्वर्गप्राप्तीहूनही श्रेष्ठ प्रयोजन म्हणजे सहृदयाच्या हृदयाला काव्यानुभूतीने मिळणारा आनन्दानुभूतिरूप चमत्कार. तो म्हणतो-

> चतुर्वर्गफलास्वादमप्यतिक्रम्य तद्विदाम्।
> काव्यामृतरसेनान्तश्चमत्कारो वितन्यते ॥
> वक्रोक्तिजीवितम् १.५

मम्मटाने अभिनवगुप्ताचे अनुकरण करीत सकल प्रयोजनमौलिभूत सद्य: परनर्वृति हे प्रयोजन् सांगितले काव्यातून तात्काळ मिळणारा रसानुभुतीचा आनन्द तो श्रेष्ठ मानतो. मम्मटाने काव्याची सहा प्रयोजने साम्गितली.

> काव्यं यशसेऽर्कृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।
> सद्य: परनिर्वृतये कान्तसम्मिततयोपदेशयुजे ॥
> काव्यप्रकाश १.२

वृत्तीमध्ये ’कालिदासादिनामिव यश’ असे म्हणून प्रत्येक प्रयोजनाचे उदाहरणही दिले. या प्रयोजनापेकी यश: असे म्हणून प्रत्येक प्रयोजनाचे उदहरणही दिले. या प्रयोजनापेकी यशसे अर्थकृते आणि शिवेतरक्षतये ही प्रयोजने कविनिष्ठ आहेत आणि व्यवहारविदे, सद्य: परनिर्वृतये आणि कान्तसम्मिततयोपदेशयुजे ही तीन प्रयोजने रसिकनिष्ठ आहेत. शिवेतरक्षतये प्रयोजन उभय निष्ठ मानता येइल. विश्वनाथाने चतुर्थ चतुर्वर्ग चा फल प्राप्ती ला काव्याचे प्रयोजन मानले तो म्हणतो–

> चतुर्वर्गफ़लप्राप्तिःसुखादल्पधियामपि।
> काव्यादेव यतस्तेन तत्स्वरूपंनिरूप्यते॥
> सहित्यदर्पण:१.२

शास्त्रज्ञानाने मिळणारी चतुर्वर्गफ़लप्राप्ती ही कष्टसाध्या आणि बुद्धिमंतांनाच होऊ शकते या उलट सितशर्करावगुण्ठित कटू औषधाप्रमाणे काव्यातून अल्प बुद्धीच्या व्यक्तीलाही सहजपणे होऊ शकते. तो काव्यानंदानुभवाला ब्रह्मानंदसहोदर म्हणतो.

काव्य शास्त्राची परंपरा पाहता कीर्ती आणि आनंद ही दोन प्रयोजने जवळपास सर्वच काव्यशास्त्रज्ञांनी सांगितलेली आहेत. त्यातही रसानुभूतीतून सहृदय रसिकाला मिळणारा आनंद सर्वश्रेष्ठ मानला आहे या पार्श्वभूमीवर प्राध्यापक राधावल्लभ त्रिपाठींनी यांनी सांगितलेल्या काव्यप्रयोजनांचा विचार करूया.

‘अभिनवकाव्यालङ्कारसूत्रम्’ हा राधावल्लभ त्रिपाठींचा ग्रंथ तीन अधिकरणांमध्ये विभक्त आहे.काव्यस्वरूपनिरूपणम् या प्रथमाधिकरणात सहा अध्याय आहेत. त्यात काव्यलक्षण काव्यप्रयोजनादींचा विचार केलेला आहे. अलङ्कारविमर्श नामक द्वितीय अधिकरणातही सहा अध्याय आहेत. काव्यविशेषविमर्श नामक तृतीय अधिकरणात पाठ्य आणि दृष्यकाव्याचा विचार केलेला आहे. हा ग्रंथ स्वोपज्ञवृत्तिकारिकांनी युक्त आहे. या ग्रंथाच्या काव्यप्रयोजननिरूपणम् नामक प्रथमाधिकरणातील द्वितीयाध्यायात काव्यप्रयोजनाचा विचार येतो. प्रथम अध्यायात काव्यलक्षणाचा विचार करुन ते काव्यप्रयोजन सांगतात. मम्मटा प्रमाणेच प्रथम काव्याचा निर्देश केलेला असल्याने पुन्हा काव्याचा तद् या सर्वनामाने उल्लेख करतात. हा सूत्ररूप ग्रंथ असल्याने प्रथम सात सूत्रांमध्ये त्यांनी

काव्यप्रयोजन स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर स्वोपज्ञवृत्तीत त्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

**काव्यप्रयोजन**

मुक्तिस्तस्य प्रयोजनम्।१.२.१ सृष्टेश्चेतनाचेतयास्त्रैविध्येन सा त्रिधा त्रिधा।१.२.२ अनुषक्तत्वं चासाम्।१.२.३ मुक्तिश्चावरणभङ्गः।१.२.४ आवरणश्च सङ्कुचितप्रमातृत्वम्।१.२.५ प्रमाता च कविः सहृदयश्च।१.२.६ तदीयचैतन्यसङ्कोचः सङ्कुचितत्वम्।१.२.७

काव्याचे प्रयोजन प्रामुख्याने मुक्ती हेच आहे.कारण येत आहे कारण अन्य सर्व प्रयोजने त्यातच विलीन होतात पूर्वाचार्यांनी सांगितलेल्या प्रयोजनांमध्ये चतुर्वर्गफलप्राप्ती हे प्रयोजन सांगितले आहे. तेथे ग्रंथकार ही मुक्ती त्रिविध असल्याचे स्पष्ट करतात. सूत्रातील प्रत्येक पदाचे वर्णन वृत्तीमध्ये केलेले आहे. जसे तस्य 'काव्यस्य प्रयोजनं मुक्तिरेव' ही मुक्ती सृष्टीच्या त्रैविध्याने त्रिविध आहे.'चेतानास्त्रैविध्येन पुनस्त्रिविधा'म्हणूनच सूत्रात त्रिधा त्रिधा असा द्विवार उल्लेख केला. त्रिविविध प्रकारची सृष्टी म्हणजे आधिभौतिक, आधिदैविक आणि अध्यात्मिक. अधिभौतिक मुक्ती मध्ये भौतिक सुखांचा विचार केला जसे सर्वांना सुख मिळो अन्नपानादि वसनभवनादि मिळावे ही अधिभौतिक मुक्ती. मनो व्याधी जाऊन प्रसन्नता मिळून त्यांची मने निष्कलुषित होवोत ही आधिदैविक मुक्ती. आणि आत्म्यात स्वरूपावस्थान म्हणजे अध्यात्मिक मुक्ती होय असे ते म्हणतात. त्यानंतर चेतनेचे त्रैविध्य स्पष्ट करताना ते म्हणतात, चेतना सुद्धा तीन प्रकारची आहे, व्यक्तिगत, समाजगत आणि ब्रह्मांडगत. त्यानुसार मुक्ती ही तीन प्रकारची होते वैयक्तिक सामाजिक आणि ब्रह्मांडीय. या सहाही प्रकारच्या मुक्ती परस्पर संबंध आहेत. सूत्रात अनुषक्तत्व शब्द वापरल्याने ग्रंथकार पुढे या शब्दाचे स्पष्टीकरण देतात. जसे शारीरिक स्वास्थ्या शिवाय मानसिक स्वास्थ्य नाही. मनःशांती शिवाय अध्यात्मिक आनंद नाही. तसेच व्यक्ती शिवाय समाज नाही आणि समाजाशिवाय विश्व नाही.

साहित्यातून हि मुक्ती कशी प्राप्त होईल हे याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात, 'साहित्यं मानवसमाजस्य सग्रमं गरिमाणं प्रतिष्ठापयति,तत्रैव जागर्ति अभिप्रेरणा आकांक्षा च समेषां कृते समानमन्नपानादिग्र्येण स्यादिति।' साहित्य सर्वांसाठी समान रूपात अन्नपानादि देते. यासाठी श्रुती वचन उद्धृत केले आहे
समानी व आकूतिः सामाना हृदयानि वः।
समानमस्तु वो मनो यथा आणि वः सुसहासति ॥ऋ.१०.१९१.४

काव्याच्या श्रवणाने पठानाने नाट्यावलोकनाने आणि नृत्य आदी कलांच्या दर्शनाने सहृदयाचे चेतनत्व हा अनुभव म्हणजेच मुक्ती. सुख-दुःखां पासून आत्यंतिक आणि शाश्वतिक मोक्ष या जगात कोणीही पाहिला नाही. काव्यानुभवात असा अनुभव येतो. काव्यरचनेने कवीला आणि सहृदयालाही मुक्ती मिळते. म्हणूनच कवी आणि सहृदय हेच प्रमाता आहेत. अभिराज राजेंद्र यांनीही व्यवहारदृष्ट्या यश हेच काव्याचे प्रयोजन आहे परमार्थदृष्ट्या काव्य निर्माण हे कवीचे स्वयंस्फूर्त स्वाभाविक कर्म- मात्र आहे.

आनंद हेच प्रमुख प्रयोजन आहे. तेथे पुन्हा श्रुतीवचनांच्या आधाराने ग्रंथकार स्पष्ट करतात, ‘आनन्दाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्त आनन्दं प्रयन्त्यंविशन्त्याह भगवति श्रुतिः। त्यामुळेच कवीची आनंदप्राप्ती हे प्रयोजन मानायला हवं. काव्यनिर्मिती शिवाय कवी राहू शकत नाही. तो धनासाठी पुण्यासाठी व्यवहारासाठी किंवा तात्काळ मिळणाऱ्या सुखासाठीही कवी काव्य करीत नाही, तर ते त्याचे स्वभावाज कर्म असते, ते केल्याशिवाय तो जगू शकत नाही जसे भ्रमर गुंजना शिवाय राहू शकत नाही, तसेच काव्यनिर्मितीची ओढ त्याला चैन पडू देत नाही. रचना केल्या शिवाय त्याला शांती मिळत नाही ही शमावाप्ती ती म्हणजे मुक्ती आहे. काव्य रचनेतून यशप्राप्ती हे प्रयोजन ग्रंथकाराला मान्य नाही. ईश्वर जसा यशाच्या कामनेने सृष्टी निर्माण करीत नाही, त्याचप्रमाणे कवीही यशासाठी काव्य करीत नाही कारण काव्यरचनेने सर्व श्रेष्ठकवींना कीर्ती मिळतेच असे नाही आणि महाकवी कीर्तीच्या प्रलोभनाने काव्य करीत नाहीत. कालिदासाच्या ‘मंदः कवियशःप्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम्' या उक्तीचे सुन्दर स्पष्टीकरण ग्रंथकार देतात.मन्देन कवियशः

प्रार्थिना मया न भाव्यम्' हा कालिदासाच्या उक्तीचा गर्भितार्थ आहे.

पूर्वाचार्यांच्या तुलनेत ग्रंथकाराने नव्याने सांगितलेल्या प्रयोजनांचा विचार केल्यास असे दिसते की, सर्व काव्यशास्त्रज्ञांनी मान्य केलेले यश आणि कीर्ती हे प्रयोजन ग्रंथकाराला मान्य नाही. यशप्राप्तीसाठी कवी काव्य करीत नाही, तर त्याच्यातील अंतःप्रेरणा त्याला काव्य करण्यास भाग पाडते. उत्तम काव्यरचनेने मिळणारे यश हे आनुषंगिक फळ आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

अध्यायारंभी 'मुक्तिस्तस्य प्रयोजनम्' असे जे म्हटले आहे ती मुक्ती म्हणजे काव्यरचना केल्या शिवाय क्षणभरही कवीला मिळू न शकणारी शमावाप्ती म्हणजेच मुक्ती. काव्यरचनेतून मिळणारा आनंद हाच खरा आनंद. कवीच्या दृष्टीने येथे शमावाप्तीचा विचार केलेला आहे सहृदय रसिकांच्या दृष्टीने विचार करताना काव्याच्या श्रवणाने पठानाने किंवा प्रत्यक्ष दर्शनाने मिळणारा आत्यन्तिक आनंदानुभव म्हणजे मुक्ती.

काव्य प्रयोजनांमध्ये चतुर्वर्गफलप्राप्ती हे प्रयोजन भामहादींनी सांगितले आहे. विश्वनाथानेही ते अनुसरले परंतु कवीची आत्यन्तिक सिसृक्षा हे प्रयोजन कोणीही सांगितले नाही. ही कवनेच्छा म्हणजे कवीच्या दृष्टीने मुक्ती हा नवीन अर्थ ग्रंथकाराने दिला. आनंदवर्धन, अभिनवगुप्त सहृदय रसिकाच्या रसास्वादजनित आनंदाला महत्त्व देतात. मम्मटही मौलीभूत प्रयोजन म्हणून रसिकांच्या दृष्टीनेच सद्यः परनिर्वृतीचे महत्त्व मान्य करतो. 'करोति कीर्तिं प्रीतिं च' म्हणताना कीर्तीचा विचार कवीच्या दृष्टीने आणि आनंदाचा विचार सहृदय रसिकांच्या दृष्टीने अधिक झाला. त्रिपाठींनी मुक्ती तीन प्रकारची मानली त्यामुळे पूर्वाचार्यांनी सांगितलेली प्रयोजने या तीन प्रकारात अंतर्भूत होऊ शकतात. मम्मटाचे यश, अर्थ, व्यवहार ही प्रयोजने आधिभौतिक प्रयोजनात अंतर्भूत होतील. शिवेत,रक्षति अधिदैविक मुक्तीत अंतर्भूत होऊ शकते, तर सद्यःपरनिर्वृति, आणि कान्तासम्मित उपदेश अध्यात्मिक मुक्तीत अन्तर्भूत होऊ शकतो परंतु येथे रसिक किंवा वाचकांचाच विचार आहे. त्रिपाठींनी अत्यंतिक सिसृक्षेचा विचार करून कवीच्या मुक्तीला प्राधान्य दिले आहे. कमितकमी सारगर्भ सूत्रांमध्ये तत्त्व विवेचन हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. आधुनिक काव्यशास्त्रात या ग्रंथाने मोलाची भर घातलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. अभिनवकाव्यालङ्कारसूत्रम् – राधावल्लभ त्रिपाठी, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय वाराणसी,२००५
2. ध्वन्यालोकः – आनंदवर्धन, संपा, विरकर प्रा. मा.वा. पटवर्धन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
3. काव्यप्रकाशः – मम्मटाचार्य, संपादक डॉक्टर गजानन शास्त्री मुसळगावकर, कृष्णदास अकादमी वाराणसी
4. साहित्यदर्पणः – विश्वनाथ, संपादक आचार्य कृष्ण मोहन शास्त्री, चौखंबा संस्कृत संस्थान वाराणसी